पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 29 वर्ष Year 2026 दिनांक Date 30/09/2026

2. (i) अधिनियम Act .......... कलमे Sections ..........
   (ii) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. 1988 कलमे Sections 7, 7(अ)
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day .......... तारीख पासून Date from दि. 05/05/2026 ते वेळ Time रोजी तारीख पर्यंत Date to दि. 07/05/2026 पर्यंत वेळ Time ..........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 05/05/2026 वेळ Time ..........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 21 तारीख Date 30/09/2026 वेळ Time 12:25 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. उत्तरेकडे 18 km चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ला.प्र.वि. मुंबई

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name एम पूर्व ठिकाणाचे नंबर No. if any विभाग, कार्यालय, गल्ली Ward बृहन्मुंबई रस्त्याचे नाव Name of road महानगरपालिका

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place गोवंडी, गाव Village मुंबई. पोस्ट Post .......... तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State ..........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station .......... तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्रीमती रजनी डंबरकर (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बबन डंबरकर

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 40 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9850084185

(e) पारपत्र क्रमांक Passport No. .......... दिल्याचा दिनांक Date of issue .......... दिल्याचे ठिकाण Place of Issue .......... (f) व्यवसाय Occupation नोकरी (पो.नि.)

(g) धर्म Religion हिंदू जात Caste .......... जनजात Sub-Caste ..........

(h) पत्ता Address लाचलुचपत गल्ली/सर्व्हे नं. Ward प्रतिबंधक घर/नाव नं. House Name No. विभाग, फोन/मो. नं. Phone No. मुंबई पॅन नं. Pan No. विभाग वोटर्स नं. Card No. कार्यालय,

रस्त्याचे नाव Road वरळी, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मुंबई. गाव Village .......... पोस्ट Post .......... पो. स्टे. P. Stn. ..........

तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State .......... सध्याचा पत्ता Present Address ..........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) गणेश हनमंतराव चांदोलकर, सहायक अभियंता, एम पूर्व विभाग, BMC, गोवंडी, मुंबई.
2) अविनाश दत्तात्रय कुडमाते, उप अभियंता, एम पूर्व विभाग, BMC, गोवंडी, मुंबई.
3) विनित खाडे (खाजगी इसम)



ASSTT. COMMISSIONER ANTI-CORRUPTION MUMBAI

Scanned with OKEN Scanner

दि. 30/09/2026

यातील फिर्यादी यांचा सविस्तर फिर्यादी जबाब स्वतंत्र कागदावर टंकलिखित केला असून त्यालाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(मानसिंग पाटील)
सहायक पोलीस आयुक्त,
ला. प्र. वि., मुंबई विभाग.

Scanned with OKEN Scanner

दिनांक ३०/०९/२०२६

जबाब

मी, श्रीमती रजनी बबन उंबरकर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग कार्यालय, वरळी, मुंबई, रा.ठी. १४७, पहिला मजला, बिल्डींग नं. ८, पोलीस अधिकारी वसाहत, डी एन नगर पोलीस ठाणे कंपाऊंड, मुंबई ४०००५८. मोबाईल क्र. ९८५००८४१८५

मी सध्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर माहे सप्टेंबर २०२५ पासून कार्यरत आहे. दिनांक ०५/०५/२०२६ रोजी श्री. सुरजकुमार प्रकाश गौडा, वय ३४ वर्षे, व्यवसाय – बी एम सी कॉन्ट्रॅक्टर, पत्ता – रुम नं. १५१/ए, अंण्णाभाऊ साठे नगर, बाबासाहेब आंबेडकर संजय गांधी नगर जवळ, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द पूर्व, मुंबई ४०००४३ हे स्वत: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या ठिकाणी तक्रार देण्यास आले असता, मा. वरिष्ठांनी श्री. सुरजकुमार प्रकाश गौडा यांच्या तक्रारीबाबत माझी पडताळणी / सापळा अधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून स.पो.आ. प्रविण पावले यांची नेमणुक केली व पुढील कारवाई करणेबाबत लेखी आदेशित केले.

त्यानंतर तक्रारदार यांना त्यांची तक्रार लेखी स्वरूपात देण्यास सांगितले असता त्यांनी सांगितले की, त्यांचे शिक्षण सातवी इयत्तेपर्यंत झाले आहे, त्यांचा लिहिण्याचा सराव सुटलेला असून लिहिताना त्यांचा हात थरथरतो त्यामुळे तक्रारदार यांच्या विनंतीवरून त्यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे त्यांचा तक्रारअर्ज आमचे कार्यालयातील लॅपटॉपवर मराठी मध्ये टाईप केला, त्यामध्ये त्यांनी ते एम पूर्व विभाग, बी एम सी वॉर्ड क्र. १४६ मधे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक ग्रंथालय, मुंबई या संस्थेला सार्वजनिक शौचालय स्वच्छतेचे काम मिळालेले असून त्या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून ते काम तक्रारदार यांना चालविण्यास मिळाले होते. त्या शौचालय स्वच्छतेच्या कामाचे बिल मंजुर करुन देण्यासाठी एम पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका येथे कार्यरत असलेले लोकसेवक सहायक अभियंता श्री. गणेश चांदवलकर व उप अभियंता श्री. दुधभाते यांनी तक्रारदार यांच्याकडे ४,००,०००/– (अक्षरी चार लाख) रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना त्यावेळी ती लाचेची रक्कम दयायची नव्हती मात्र नाईलाजास्तव त्यांनी त्यापैकी २,००,०००/– (अक्षरी दोन लाख) रुपये लोकसेवक सहायक अभियंता श्री. गणेश चांदवलकर व उप अभियंता श्री. दुधभाते यांनी सांगितल्याप्रमाणे ठेकेदार खाजगी इसम विनीत याच्याकडे एम पूर्व विभाग बी एम सी कार्यालयाजवळ दिले होते. त्यांनतर ती रक्कम विनित यांनी तक्रारदार यांचे समक्ष सहायक अभियंता श्री. गणेश चांदवलकर यांचेकडे दिली होती. त्यानंतर उर्वरित दोन लाख रुपये लाचेची रक्कम कधी देणार याबाबत देखील ते प्रत्यक्षात वारंवार विचारणा करीत असत.

तसेच लोकसेवक श्री. गणेश चांदवलकर व श्री. अविनाश दुधभाते यांनी तक्रारदार यांच्याकडे पिंक आर्मी योजने अंतर्गत केलेल्या कामाचे बिल एकूण रू. १५,६३,०००/– (अक्षरी पंधरा लाख त्रेसष्ठ हजार) मंजुर करण्यासाठी रू. १,५०,०००/– (अक्षरी दिड लाख) लाच रक्कमेची मागणी केली होती. सदर बिलाचे अनुषंगाने तक्रारदार यांना माहे एप्रिल २०२६ मध्ये रक्कम रू. १५,१६,०००/– (अक्षरी पंधरा लाख सोळा हजार) इतके बील मिळाले होते. त्यामधील दि. ०१/०९/२०२५ ते दि. १२/०९/२०२५ या कालावधी दरम्यान केलेल्या कामाचे रू. १,०३,६३२/– (अक्षरी एक लाख तीन हजार सहाशे बत्तीस) इतक्या रक्कमेचे बिल मंजूर होणे बाकी होते. त्यानुसार पिंक आर्मी योजने अंतर्गत बिल मंजुर करुन देण्यासाठी १,५०,०००/– रुपये व सार्वजनिक शौचालय स्वच्छतेच्या कामाचे मंजुर बिलाबाबत लोकसेवक यांनी याआधी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी उर्वरित रू. २,००,०००/– (अक्षरी दोन लाख) असे एकत्रित रू. ३,५०,०००/– (अक्षरी साडे तीन लाख) रुपयांची लाचेची मागणी केली. मात्र तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ०५/०५/२०२६ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात समक्ष हजर होवून आमचेकडे लेखी तक्रार दिली.

मी, पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. प्रविण पावले यांचे सोबत चर्चा करून तातडीने पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्यानुसार प्रभारी पोलीस हवालदार ९६०२६४/शेमडकर यांना पंच व पथकाची नियुक्ती करण्याबाबत आम्ही तोंडी सुचना दिल्या. आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे पंच व पडताळणी पथकाची नियुक्ती केल्यानंतर काही वेळातच दोन शासकीय पंच आमचे समक्ष पोह शेमडकर यांचे सोबत हजर झाले तेव्हा त्यांना त्यांचे नाव व पद

Scanned with OKEN Scanner

विचारले असता पंच श्री. दिगंबर गणपत वाघ, वय ३७ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद – राज्यकर अधिकारी, कार्यालयीन पत्ता – वस्तु व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई ४०००१० व पंच श्री. अतुल सुधाकर पाटील, वय ४० वर्षे, व्यवसाय नोकरी, पद – राज्यकर अधिकारी, कार्यालयीन पत्ता – वस्तु व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई ४०००१० अशी दोन्ही शासकीय पंचांची आम्ही ओळख करुन घेतल्यानंतर त्यांची तक्रारदार यांचेशी ओळख करुन देवून दि. ०५/०५/२०२६ रोजीच्या तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाबाबत पंचाना समजावून सांगून तक्रारदार यांचा मराठी मध्ये टंकलिखीत केलेला तक्रार अर्ज तक्रारदार श्री. गौडा यांना वाचुन दाखवला व समजावुन सांगितला. तसेच पंचानामा वाचण्यास दिला व नमुद पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम करण्याची विनंती केली आम्ही केलेल्या विनंतीनुसार दोन्ही पंचांनी पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम करण्यास होकार दर्शविला. त्यानंतर सदर तक्रार अर्जावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या व समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली तसेच पर्यवेक्षक अधिकारी म्हणून स.पो.आ. प्रविण पावले यांनी स्वाक्षरी केली. सदर तक्रार अर्जाला पडताळणी क्र. ३१/२०२६, दि. ०५/०५/२०२६ देण्यात आला.

त्यानंतर, लोकसेवक हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने अवलंबविण्यात येणारी सर्व प्रक्रीया मी व सपोआ प्रविण पावले यांनी दोन्ही पंच तसेच तक्रारदार यांना समजावुन सांगितली. त्यानंतर मी, सपोआ पावले, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. सुरज गौडा असे आम्ही गोपनीय कक्षात गेलो तेथे तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये मोबाईल फोनद्वारे किंवा समक्ष होणारे संभाषण कशाप्रकारे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येईल याची माहिती दोन्ही पंच व तक्रारदार यांना दिली. त्यानंतर तांत्रिक शाखेचे पो.ह. रावराणे यांचे मदतीने डि.व्ही.आर मधील नवीन कोऱ्या एस.डी. कार्डमध्ये मी, तक्रारदार व दोन्ही पंच असे आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांची कारवाई मध्ये भाग घेणाऱ्या पोलीस पथकाची ओळख करून दिली व सर्वांना पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर दिनांक ०५/०५/२०२६ रोजी १५:५० वा. मी, तक्रारदार, दोन्ही पंच व पथकातील अधिकारी व अंमलदार असे पथक लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह शासकीय वाहनाने लोकसेवक कार्यरत असलेल्या एम पूर्व विभाग, गोवंडी येथे गेलो. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र. १, श्री. वाघ यांना लोकसेवक यांना भेटण्यासाठी ते कार्यरत असलेल्या कार्यालयात पाठविण्यात आले असता, त्या दिवशी लोकसेवक हे कामानिमित्त बाहेर गेले असल्याने त्यांची भेट होवू शकली नाही त्यामुळे सदर दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दिनांक ०६/०५/२०२६ रोजी मी, सपोआ पावले, तक्रारदार, दोन्ही पंच व पथक असे लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह शासकीय वाहनाने लोकसेवक कार्यरत असलेल्या एम पूर्व विभाग, गोवंडी येथे गेलो. दि. ०५/०५/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये वापरण्यात आलेले एसडी कार्ड मध्ये मी, तक्रारदार व दोन्ही पंच असे आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन सकाळी ११.५३ वा. तक्रारदार व पंच क्र. १, श्री. वाघ यांना लोकसेवक यांना भेटण्यासाठी ते कार्यरत असलेल्या कार्यालयात पाठविण्यात आले असता, लोकसेवक हे तक्रारदार यांना कार्यालयाच्या मेनगेट जवळ भेटले, तेथे तक्रारदार यांचेशी वॉलपेंटींग कामासंदर्भात त्यांच्यात चर्चा झाली व लोकसेवक हे कामानिमित्त बाहेर जात असल्याने अर्ध्या तासात परत येतो असे त्यांनी सांगितले यावर तक्रारदार यांनी त्यांना एक तासात काम संपवून येतो असे सांगितले.

त्यानंतर पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दुपारी १४.२० वा. तक्रारदार व पंच क्र. १, श्री. वाघ यांना लोकसेवक यांना भेटण्यासाठी ते कार्यरत असलेल्या कार्यालयात पाठविण्यात आले असता, लोकसेवक यांना संशय येवू नये म्हणून तक्रारदार यांनी स्वत:हूनच पंच क्र. ०१ वाघ यांना कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्याच्या जिन्याजवळ थांबण्यास सांगितले व तक्रारदार हे लोकसेवकास भेटण्यासाठी लोकसेवक यांच्या चौथ्या मजल्यावरील केबिनमध्ये गेले.

सदर पडताळणी दरम्यान तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाली. त्यावेळी खाजगी इसम विनीत खाडे हे तेथे समक्ष उपस्थित होते, तसेच संभाषणा दरम्यान लोकसेवक श्री. अविनाश दुधभाते हे देखील तेथे आले. तक्रारदार

Scanned with OKEN Scanner

.श्री. सुरजकुमार प्रकाश गौडा यांनी लोकसेवक श्री. गणेश चांदवलकर, अविनाश दुधभाते व खाजगी इसम विनीत खाडे यांचेसोबत समक्ष भेटीमध्ये लाच रक्कमेसंबधीत झालेले संभाषण पुढीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| खाजगी इसम विनीत | सर सुरज आला. |
| लोकसेवक गणेश | बोलुया. दोन मिनटं थांबा. |
| खाजगी इसम विनीत | मुझे बोले तेरे पास लेके रख और तु बात तो कर, मै कैसे डायरेक्ट बोलु तेरे को. |
| तक्रारदार | क्या कितना तुम डायरेक्टली उपर, कौनसा उसके दिमाख मे बाकी है वो मेरे को नही समझ रहा है ना. |
| खाजगी इसम विनीत | कमसे कम मे खिच. |
| लोकसेवक गणेश | त्याला, त्याला माहिती आहे ना किती बॅलेंन्स आहे आपलं, तुम्हीच सांगा. |
| तक्रारदार | सर |
| लोकसेवक गणेश | तुम्हीच सांगा. तुम्हीच सांगा. तुम्ही जे सांगाल मी ते यस करणार बस. |
| तक्रारदार | सर पिंक आर्मीच किती करू तुम्ही बोलताय, पिंक आर्मीच किती ? |
| लोकसेवक गणेश | पन्नास पन्नास पन्नास, कुठलं हया हया हे आत्ताच आहे का ? |
| लोकसेवक गणेश | मागच्या वेळेस किती केलेलस ? तु सांग |
| खाजगी इसम विनीत | माझ नव्हतं |
| लोकसेवक गणेश | कोण होत मागच्या वेळेस |
| तक्रारदार | आम्हीच होतो मागच्या वेळेस, अज्जु बिज्जु सर्वांनी दिलेत. |
| लोकसेवक गणेश | जेवढे दिले त्यावेळेस तेवढे दे. तुमच्या मते, मला माहित नाय किती दिलेस, ते माहिती द्या आणि तेवढे द्या. |
| तक्रारदार | मागच्या टायमीच साहेब एक एक घेतलेले ना |
| लोकसेवक गणेश | हं. |
| तक्रारदार | एक लाख, एक लाख घेतलेलं त्याच्याकडनं. |
| लोकसेवक गणेश | हा. |
| लोकसेवक गणेश | तु तुझ्या मताने किती द्यायला पाहिजे तो ( विनतीकडे हाताने इशारा करून ) |
| तक्रारदार | आता तुम्ही कुठलं अजुन कुठलयं तुम्ही ते सांगा सर, टॉयलेटच तर मी क्लिअर केलयं सर, दोन दिलेत आणि सर ते |
| लोकसेवक गणेश | चार बोलली होतो आपण, चार बोलली टॉयलेटच |
| तक्रारदार | टॉयलेटच चार |
| लोकसेवक गणेश | सात, सातच दिलेल टारगेट. |
| तक्रारदार | हो सर पण |
| लोकसेवक गणेश | चार बोलली होतो तुला मी, तु मला दोनच दिलेस. |
| तक्रारदार | दोन दिले सर |
| लोकसेवक गणेश | हं. |
| तक्रारदार | डिएमसी पाच टक्का आणि वॉर्ड ऑफीसर दोन |
| लोकसेवक गणेश | सगळं सगळं सोडुन आपण चारच झाल होत बोलण आपल |
| लोकसेवक गणेश | मग आता बरं बरं तिथुन किती मिळणार ? |
| तक्रारदार | आता तुम्हीच सांगा सर. जे तुम्ही प्लीज सर थोडा |
| लोकसेवक गणेश | ते एक दे. ते, ते चार होत होत ना तर त्यातल मी एक दोन पैकी एक मायनस केलं. एक दे त्यातला आणि हयातल तु किती देतो ते सांग मला. झाल का सगळं हे घेवुन जा. |
| लोकसेवक गणेश | बरं मी सगळ करून, मला हिशोब पण माहित नाय रे, आयडीया नाही. मी काय हे बघ त्या गोष्टीमध्ये पडत पण नाही. जे तुम्ही ठरते ना त्याच्यावरच मी हे सगळ तरी आपण हयाला विचार. आ! मेरा कुछ रहता है क्या ऐसा कुछ. ये देदो इतनाही देदो. जब जब, ज्यावेळेस तुम्ही बोलले त्याच वेळेस तेवढ बोलली. मी काय अडवुन पण मागत नाय तुम्हाला. |
| तक्रारदार | हयावेळी सर थोडा मला माझ्यासाठी डिस्काऊंट द्या. पुढच्या कामात तुम्ही जे जे काम देल ना त्याचा मी करतो. मला पण साहेब |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| लोकसेवक गणेश | नाही नाही नाही. बरोबर आहे तुझं म्हणणं. पण तु सांग मला हे, तुझं जे असेल तेवढी घेवुन टाकु चल. |
| तक्रारदार | पिंक आर्मीच |
| लोकसेवक गणेश | क्लिअर सांगतो. |
| तक्रारदार | टॉयलेटच सोडुन द्या सर पिंक आर्मीच करतो. |
| लोकसेवक गणेश | अरे वैसा मत कर यार. टॉयलेट का बिल ज्यादा था. |
| लोकसेवक गणेश | हो म ते दोन होते ना माझे जे तुला देण्याचे त्यातल एक मायनस करतो ना मी, एक दे ना त्यातलं, दोन तु मला देणार होतास आणि चार, चार पैकी एक मायनस करून घे तुझा आणि एक दे मला त्यातला. |
| लोकसेवक गणेश | हा. ये एक ये एक, दोन होतात. |
| तक्रारदार | थोडा कमी, ऑलरेडी, सर काय |
| लोकसेवक गणेश | दे बाबा तुला तुला काय द्यायचेय ते दे. काही टेंन्शन घेवु नको. मी तुला काय नाराज करत नाही. कोणालाच नाराज करत नाही. पण काय होतयं रे ते आमचे दोन सब इंजिनीयर आहेत. ते त्यांना अस वाटत की मग अेईनेच काही तरी बदल केला. पण काय आपलं तस काय नसतं. ते त्यांना पण तेवढच आपण देतो काढुन त्यातले. आपण काही ठेवत पण नाही. हं. |
| तक्रारदार | ठिक आहे. |
| लोकसेवक गणेश | तुला काय द्यायचेय ते दे. |
| तक्रारदार | कोणाकडे देवु सर? |
| लोकसेवक गणेश | ह्याचेकडे दे. ह्याच्याकडे देवुन टाक (खाजगी इसम विनीतकडे हाताने इशारा करून) |
| तक्रारदार | उद्या दु? |
| लोकसेवक गणेश | आणि कुठलं पण आहे ना, ते तुम्ही आहे ना, सगळ्यांनाच काम देतो म्हणतोय ना, अस काय नाही. टोपी बनवतोय अस नाही. फक्त थोडस बघत होतो की काय होतय ते चेक केलयं आता. राऊंडली सगळ्यांनाच काम देणार. सहा फाईली बनवल्यात त्या |
| तक्रारदार | हं. |
| तक्रारदार | सर थोडा काही तरी कमी करा. थोडा काही तरी कमी म्हणजे सर दोन, काय झाल सर मी सांगु का तुमचा अमाऊंट आहे ना मी पहिल्या दिवसापासुन आहे ना पिंक आर्मीच जस पेमेंट आल ना ते काढुनच ठेवलेलं. |
| लोकसेवक गणेश | हं. |
| | (दरम्यान लोकसेवक गणेश यांनी हाताने इशारा करून लोकसेवक दुधभाते यांना तिथे बोलाविले त्याप्रमाणे ते तिथे आले होते त्यांचेशी यासंबंधीत झालेले संभाषण खालीलप्रमाणे) |
| लोकसेवक दुधभाते | कुठला प्रभाग द्यायची. |
| लोकसेवक दुधभाते | जा तिथे, खोडके साहेब आरडीला पण मेसेज दिला होता. त्याला पाच टक्के पाहिजे पिंक आर्मीमध्ये, रिलीज केला तुम्ही अस का करता म्हणुन. मला दिलेच नाय तुम्ही काय हजार हजार रूपये दिलेत. हजार रूपये दिलेत. मी एवढ काय असत का म्हणलं. |
| लोकसेवक दुधभाते | मी म्हणलं सर आता आम्हालाच काही दिल नाही काही लोकांनी. तर आम्ही काय बोलु शकणार |
| तक्रारदार | काही लोकांनी नाही सर फक्त मीच नाही दिले. बाकी सर्वांनी तर दिले तुम्हाला. |
| लोकसेवक दुधभाते | अरे पण ते |
| खाजगी इसम विनीत | बोलायला लागत. त्याला बोलल्या नंतर तो |
| लोकसेवक दुधभाते | त्याला बोलल ना मग तुम्ही जास्त हे करता आणिक |
| तक्रारदार | सर मी पिंक आर्मीच जे आहे बोललेले आहेत. जे ठरल आहे एक मी उद्या विनीत भाईकडे देतो. फक्त |
| लोकसेवक दुधभाते | मी सुट्टीवर चाललोय. विनीत राहु दे तुझ्याकडं |
| तक्रारदार | हा. |
| खाजगी इसम विनीत | माझ्याजवळ ठेव. मी खर्च करतो मी परत आल्यावर देतो. |
| लोकसेवक दुधभाते | त्यांचे द्याना. हे नाहीतर रात्री भुत लागल्यासारख लागतील पाठीमागे. |
| खाजगी इसम विनीत | हा त्यांच देतो आल्या आल्या. |
| तक्रारदार | तर साहेब आल्यानंतर देतो ना, फिर मै पगार बिगार घुमाता हु ना. |
| खाजगी इसम विनीत | चलेगा तेरे को क्या, ऐसा क्या नही. मै इनको ऑनलाईन भेजुंगा. |
| लोकसेवक दुधभाते | त्यांनला त्यांनला कमिटमेंट दिल. देवुन टाका. त्याला काय नसतो. हा. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| खाजगी इसम विनीत | ते देवुन टाका. मगजमारी नको. मुझे फोन करेगा नही तो वो. |
| लोकसेवक दुधभाते | आता कमिटमेंट केलस ना देवुन टाक. त्याला मी त्याच्याकडनं मागुन घेतो त्याच्याकडुन |
| तक्रारदार | ठिक आहे. |
| लोकसेवक दुधभाते | कोणाच्या तरी अकाऊंटवर वगैरे |

दि. ०६/०५/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक गणेश चांदवलकर यांनी तक्रारदार यांचेकडे रू. २,००,०००/— एवढया रक्कमेची लाचेची मागणी केली व लोकसेवक अविनाश दुधभाते यांनी देखील तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यास सांगितले व खाजगी इसम विनीत खाडे यांने सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे कबुल करून तो ती रक्कम लोकसेवक यांना पोहोच करेल असे मान्य करून सदरची रक्कम तक्रारदार यांना दि. ०७/०५/२०२६ रोजी घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून दि. ०७/०५/२०२६ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. त्याअनुषंगाने तक्रारदार यांना सदरच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता आणलेली रक्कम ही तक्रारदार यांनी त्यांच्या व्यवसायातून मिळालेल्या रक्कमेतील बचतीमधून आणली असल्याचे सांगितले. त्यानंतर सापळा पथकातील अमंलदारा मार्फत वर नमुद तक्रारदार यांनी दिलेल्या बचतीमधील रु. १,९५,०००/— रक्कमेच्या नोटांचे प्रिंटर झेरॉक्स मशीन मधुन प्रिट काढल्या.

तसेच लोकसेवकास लाच म्हणुन दयावयाची असलेली रक्कम २,००,०००/— पैकी तक्रारदार यांनी चलनी नोटा रु. १,९५,०००/— रक्कम सादर केली असुन उर्वरीत रक्कम रु.५,०००/— ही लहान मुलांच्या खेळण्यातील डमी नोटा वापरण्यात येणार असल्याचे मी पंचाना सांगितले.

त्यानंतर चालक पो.शि.चा. २१६३९५/ साबळे यांना लाप्रवि पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये बोलविले. माझ्या सांगण्याप्रमाणे पो.शि. साबळे यांनी पंच व तक्रारदार गौडा यांना ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म व उद्देश समजावून सांगून प्रात्यक्षिक करुन दाखवले. चालक पो.शि. साबळे यांनी लाचेची रक्कम म्हणुन वापरावयाची रक्कम रुपये २,००,०००/— मधील ( भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या ३९० नोटा रु. १,९५,०००/—) व (डमी वापरण्यात येणाऱ्या नोटा म्हणुन 'भारतीय बच्चो का बैंक' ५०० दराच्या १० डमी नोटा ) यांना ॲन्थ्रासीन पावडर लावली. पो.शि. साबळे हे सापळयाच्या पुढील कारवाईत प्रत्यक्ष सहभागी होणार नाहीत असे मी, पंच व तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर सपोआ पावले यांनी पंच, तक्रारदार व पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने घ्यावयाच्या खबरदारीच्या योग्य त्या सूचना दिल्या.

त्यानंतर मी, सपोआ पावले, तक्रारदार, दोन्ही पंच व पथक असे शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालयातून लोकसेवक कार्यरत असलेले कार्यालय एम पूर्व, विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका गोवंडी च्या दिशेने रवाना झालो. सदर ठिकाणी पोहोचल्यानंतर सपोआ प्रविण पावले यांनी तक्रारदारास खाजगी इसम विनीत खाडे याच्या भेटीबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की ते खाजगी इसम विनीत यास कॉल करुन विचारणा करणार आहेत. त्यावरुन तक्रारदार यांनी त्यांचे मो.न. ७७१५८१२३७० वरुन खाजगी इसम विनीत यांचा मोबाईल नंबर ९७७३३१५९३४ वर कॉल केला तेव्हा खाजगी इसम विनीत याने ते अंधेरी येथे कामानिमित्त गेले असून पाच वाजेपर्यंत कार्यालयात येतील असे कळविले परंतू बराच वेळ झाला तरी खाजगी इसम विनीत खाडे हे लाचेची रक्कम स्विकारण्यास आले नाहीत व तोपर्यत लोकसेवक श्री. गणेश चांदवलकर हे कार्यालयातून घरी रवाना झाले. त्यामुळे सापळा कारवाई पूर्ण झाली नाही. सबब दि. ०७/०५/२०२६ रोजीची सापळा कारवाई काढुन घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्याप्रमाणे सदर दिवशी सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर खाजगी इसम श्री. विनीत खाडे याने लाचेची रक्कम घेण्याबाबत कोणतेही बोलणे केले नाही. यावरुन तक्रारदार यांची खात्री झाली की लोकसेवक यांना संशय आला असावा म्हणून त्यांनी तक्रारदार यांचेकडून त्यांनी लाचेची रक्कम स्विकारलेली नाही. लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली व खाजगी इसम श्री. विनीत खाडे यांनी ती रक्कम लोकसेवकांना देण्यासाठी स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे.

Scanned with OKEN Scanner

दरम्यान मी, तक्रारदार यांचेकडे माहिती घेतली असता त्यांनी त्यांचे उर्वरित असलेले बिल मंजुर झाले असल्याचे सांगितले. तसेच मी, लोकसेवक यांचे नाव पत्त्याबाबत अधिक माहिती प्राप्त केली असता, लोकसेवक श्री. गणेश चांदवलकर यांचे नाव श्री. गणेश हनमंतराव चांदोलकर असे आहे व श्री. अविनाश दुधभाते यांचे पूर्ण नाव श्री. अविनाश दत्तात्रय दुधभाते असे असल्याचे समजले.

वरील प्रमाणे तक्रारदार श्री. सुरजकुमार प्रकाश गौडा यांनी केलेल्या तक्रार अर्जावरून दिनांक ०५/०५/२०२६ व दिनांक ०६/०५/२०२६ रोजी पडताळणी पंचनामे करण्यात आले पडताळणी कारवाई दरम्यान एम पूर्व, विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका गोवंडी येथे कार्यरत लोकसेवक सहाय्यक अभियंता गणेश हनमंतराव चांदोलकर यांनी स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी तक्रारदार यांनी पिंक आर्मी योजने अंतर्गत तसेच सार्वजनिक शौचालयाच्या स्वच्छतेच्या कामाचे बिल मंजुर करुन देण्यासाठी प्रत्यक्षात रुपये २,००,०००/- एवढया लाचेची मागणी केली व लोकसेवक उप अभियंता अविनाश दत्तात्रय दुधभाते यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम देण्यास सांगितले. तसेच खाजगी इसम विनीत खाडे यांनी लाच रक्कम मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डिंग मध्ये स्पष्टपणे निष्पन्न झाले आहे म्हणून माझी लोकसेवक सहाय्यक अभियंता गणेश हनमंतराव चांदोलकर व उप अभियंता अविनाश दत्तात्रय दुधभाते यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित २०१८) चे कलम ७ अन्वये व खाजगी इसम विनीत खाडे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित २०१८) चे कलम ७ (अ) अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

( मानसिंग पाटील )
सहायय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ पडताळणी क्र. ३१/2026 वरून

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ -

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ -

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. नमूद तारीख वेळी व ठिकाणी पडताळणी कारवाई दरम्यान यातील तक्रारदार श्री. गोडे यांच्याकडे एमपूर्व विभाग, BMC, गोवंडी येथे कार्यरत लोकसेवक सहायक अभियंता गणेश हनमंतराव चोंडेकर यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता पिंक आशी योजना अंतर्गत व सार्वजनिक शौचालयाच्या स्वच्छतेच्या कामाचे बिल मंजूर करुन देण्यासाठी रु. 2,00,000/- एवढ्या लाचेची मागणी केली व लोकसेवक उपअभियंता अविनाश दत्तात्रय कुंभारे यांनी देखील लाच रक्कम देण्यास सांगितले असल्याने कलम 7 भ्र.प्र. अधि. 1988 तसेच खाजगी इसम विनोद खाडे याने लोकसेवकाकरिता लाच रक्कम मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने कलम 7(अ) भ्र.प्र.अधि. 1988 अन्वये यांच्या

13. केलेली कार्यवाही –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या विरुद्ध गुन्हा नोंद.

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : स.पो.आ. मानसिंग पाटील

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ........... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................

(3) Transferred to P. S. ........................
District ........................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ मानसिंग पाटील

पदनाम Rank ........ सहायक पोलीस आयुक्त,

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई विभाग.

Posting

Code No. of I. O. ........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........................................

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner